# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे अधिवेशन, २०२३

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक ०१ ऑगस्ट, २०२३ / श्रावण १०, १९४५ (शके)**

**(१) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री**
**(२) उच्च व तंत्र शिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्ये मंत्री**
**(३) उद्योग मंत्री**
**(४) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री**
**(५) शालेय शिक्षण, मराठी भाषा मंत्री**
**(६) अन्न व औषध प्रशासन मंत्री**

**यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३७**

---

### नागपूर जिल्हा परिषदेत पुरवठादाराने विज्ञान साहित्य बदलून दिले नसतानाही त्याची देयके अदा करण्यात आल्याबाबत

**(१) * १९९१५ श्री.सुधाकर अडबाले, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागामार्फत दीड कोटी रुपयांचे ३०६ प्रकारचे विज्ञान साहित्य खरेदी करण्यात आले असून, पुरवठादाराने उपयुक्त विज्ञान साहित्य न दिल्याने ते बदलुन देण्याचे आदेश देण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दोन वर्षांचा कालावधी उलटुनही अद्यापपर्यंत पुरवठादाराने साहित्य बदलुन दिले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पुरवठादाराने विज्ञान साहित्य बदलून दिले नसतानाही सदर पुरवठादाराची देयके अदा करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दीड कोटी रुपयांचे उपयुक्त विज्ञान साहित्य बदलुन न देणाऱ्या पुरवठादारावर तसेच विभागाकडून पुरवठादाराची देयके अदा करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) हे अंशत: खरे आहे.

जिल्हा परिषद, नागपूर शिक्षण विभागात सन २०२२-२३ करिता जिल्हा नियोजन समितीमार्फत रुपये १.५० कोटी इतका निधी प्राप्त झाला होता.सदर निधीमधून साहित्य खरेदी करण्याची विहीत प्रक्रिया राबविण्यात आली होती.

सदर विज्ञान साहित्याची तपासणी मे. शिव मल्हार लॅबोरेटरीज, नागपूर यांच्याकडून करण्यात आली असून खरेदी करावयाच्या निवडक विज्ञान साहित्यापैकी दर्जायोग्य नसलेल्या साहित्याचा चुकीचा अहवाल सादर केला आहे. सदर लॅबोरेटरीस प्रतिबंधित करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडून उद्योग, ऊर्जा व कामगार विभागास कळविण्यात आले आहे. तसेच, शाळांना उपयुक्त असलेल्या ३०६ विज्ञान साहित्यापैकी फक्त दर्जायोग्य असणाऱ्या १०० साहित्याचे देयक अदा करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शालेय शिक्षण विभागामार्फत करण्यात आलेल्या तपासणीत राज्यात बोगस शाळा आढळून आल्याबाबत

**(२) * १९५७४ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.अरुण लाड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, श्री.सचिन अहिर, श्रीमती उमा खापरे, श्री.रामदास आंबटकर, प्रा.राम शिंदे, श्री.रमेश कराड, श्री.प्रवीण दटके, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.अनिकेत तटकरे, श्री.कपिल पाटील, श्री.जयंत पाटील, श्री.सत्यजीत तांबे, श्री.राजहंस सिंह, श्री.आमश्या पाडवी, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गेल्या काही वर्षात स्वयंअर्थसहाय्यीत तत्वावर अनेक इंग्रजी माध्यमाच्या १३०० शाळा सुरु करण्यात आल्या असून शालेय शिक्षण विभागाने सदर शाळांचे सर्वेक्षण केले असता केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (सीबीएसई), इंडियन सर्टिफिकेट ऑफ सेकंडरी एज्युकेशन (आयसीएसई) आणि इंटरनॅशनल बोर्ड (आयबी) या मंडळांच्या शाळेच्या मान्यतेच्या कागदपत्रांमध्ये अनेक त्रुटी असल्याने ८०० शाळा अनधिकृत असून त्यापैकी १०० शाळा कायमस्वरुपी बंद करण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षण विभागाने अनधिकृत शाळांवर कारवाई करणे तसेच सर्वच खाजगी शाळांची तपासणी करणे गरजेचे असल्याबाबत ‘समर्थन’ संस्थेने पत्रान्वये मा.मंत्री, शालेय शिक्षण, सचिव, शालेय शिक्षण, उप संचालक, शालेय शिक्षण विभाग यांच्याकडे दिनांक ३ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनधिकृत सुरु असणाऱ्या शाळांमध्ये मुंबईतील २१० शाळा अनधिकृत असल्याने सुमारे ६० हजार विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून ठाणे जिल्ह्यातील शहरी भागासह ग्रामीण जिल्हा

परिषदेच्या कार्यक्षेत्रात ३७ शाळा अनधिकृत असून त्यापैकी १५ शाळांना कायमचे टाळे ठोकून ३ शाळांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले असून शालेय शिक्षण विभागाच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे घाटकोपर, पनवेल (जि.रायगड) तसेच पुणे व पालघर जिल्ह्यात अनधिकृत शाळांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याने अशा शाळांवर कारवाई किंवा दंडवसुलीही केली जात नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यु-डायस क्रमांक असूनही बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील २६८ शाळांना अनधिकृत घोषित करण्यात आल्याने हजारो विद्यार्थ्यांचे शिक्षण धोक्यात आले असून मुंबईसारख्या महानगरपालिकाक्षेत्रात अत्यंत गरीब, दलित व अल्पसंख्याक समुहातील विद्यार्थ्यांना शिक्षण देणाऱ्या या संस्थाबाबत शासनाचे स्वतंत्र धोरण काय आहे तसेच खाजगी शाळांच्या शैक्षणिक गुणवत्तेबाबत माहिती व्हावी यासाठी NAAC च्या धर्तीवर शाळांचे मूल्यांकन करण्याची बाबसुद्धा शासनाच्या विचाराधीन असून शाळांच्या प्रमाणपत्रांची वैधता तपासण्यासाठी शिक्षण सह संचालक, प्रशासन अंदाज व नियोजन यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समितीने शाळांच्या प्रमाणपत्रांची पडताळणी करून अहवाल सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुषंगाने अनधिकृत शाळा चालविणाऱ्या संस्था चालक व व्यवस्थापनांविरुध्द गुन्हे नोंद (FIR) दाखल करून कोणती कारवाई केली तसेच बंद केलेल्या अनधिकृत शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक व पालकांचे आर्थिक नुकसान होऊ नये यासाठी तसेच NAAC च्या धर्तीवर मूल्यांकन करण्याबाबत व शिक्षण सह संचालक, प्रशासन अंदाज व नियोजन यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समितीने सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) राज्यातील खाजगी व्यवस्थापनाद्वारे सुरू शाळांपैकी ६६१ शाळा या अनधिकृतपणे सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यापैकी १२३ शाळा बंद करण्यात आल्या आहेत.

(२) अशा स्वरुपाचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून आलेले नाही. तथापि, सर्व खाजगी व्यवस्थापनाच्या शाळांची तपासणी मोहीम माहे जानेवारी, २०२३ पासून हाती घेण्यात आली आहे.

(३) मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील एकूण १८६ अनधिकृत शाळांपैकी १४ शाळा बंद करण्यात आल्या असून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये या उद्देशाने या शाळांमधील विद्यार्थ्यांचे समायोजन करण्यात आले आहे.

ठाणे जिल्ह्यातील ९३ अनधिकृत शाळांपैकी १ शाळा बंद करण्यात आली आहे. ४२ शाळांना नोटीस बजावण्यात आली आहे. व काही प्रकरणी गुन्हे दाखल करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. दंड आकारण्यात आलेल्या शाळांपैकी २ शाळांनी दंड भरला आहे.

(४) व (५) यु-डायस क्रमांक असणे हे शाळा अधिकृत असल्याचे प्रमाणक नाही. सद्यस्थि:तीत राज्यात खाजगी व्यवस्थापनाच्या ६६१ शाळा अनधिकृत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यातील दंड आकारण्यात आलेल्या शाळांची संख्या २६ व प्रथम खबरी अहवाल (FIR) नोंद केलेल्या शाळांची संख्या १९ आणि बंद करण्यात आलेल्या शाळांची एकूण संख्या १२३ आहे.

शासन मान्यता, शासन ना-हरकत प्रमाणपत्र, परीक्षा मंडळ संलग्नता, इ. महत्वाचे कागदपत्रे नसणाऱ्या शाळांवर कार्यवाही करण्याचे निर्देश क्षेत्रिय अधिकाऱ्यांना वेळोवेळी देण्यात येत आहेत. राज्यातील अनधिकृत शाळांवर दंड आकारणे, फौजदारी गुन्हा दाखल करणे व गंभीर प्रकरणांमध्ये संबंधित शाळा कायमस्वरूपी बंद करण्याची कार्यवाही करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच, अनधिकृत शाळांविरुध्द कारवाई न करणाऱ्या शिक्षणाधिकारी/ गट शिक्षण अधिकारी यांना "कारणे दाखवा" नोटीसा बजावण्यात आल्या आहेत.

तसेच, प्रस्तुत प्रकरणी शिक्षण सहसंचालक, प्रशासन अंदाज व नियोजन यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली आहे. सदर समितीने सादर केलेला अहवाल शासनाच्या विचाराधीन आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील उच्च व तंत्र शिक्षण विभागातंर्गतच्या वरिष्ठ महाविद्यालयातील एम.फिल पात्रताधारक प्राध्यापकांना व सहयोगी प्राध्यापकांना CAS (career advancement scheme) चे लाभ देण्याबाबत

**(३) * १९६६२ श्री.किरण सरनाईक :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत येत असलेल्या वरिष्ठ महाविद्यालयातील सन २००९ पूर्वीच्या एम.फिल पात्रताधारक प्राध्यापकांना व सहयोगी प्राध्यापकांना CAS (career advancement scheme) चे लाभ देय दिनांकापासून मिळत नसल्याची बाब माहे मे, २०२३ च्या शेवटच्या सप्ताहात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुषंगाने उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत येत असलेल्या वरिष्ठ महाविद्यालयातील सन २००९ पूर्वीच्या एम.फिल पात्रताधारक प्राध्यापकांना व सहयोगी प्राध्यापकांना CAS (career advancement scheme) चे लाभ नियुक्ती दिनांकापासून मिळणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) व (२) विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि.०५ सप्टेंबर, २०२२ च्या पत्रान्वये एम.फिल अर्हताधारक अध्यापकांना कॅस अंतर्गत पदोन्नतीचे लाभ अनुज्ञेय करण्यासंदर्भात स्पष्टीकरण निर्गमित करण्यात आले आहे. त्यानुषंगाने कार्यवाही करण्याबाबत शासनाच्या दि.१६ नोव्हेंबर, २०२२ च्या पत्रान्वये संचालक, उच्च शिक्षण यांना कळविण्यात आले आहे. तसेच यासंदर्भात दि.१६ फेब्रुवारी, २०२३ च्या पत्रान्वये खालीलप्रमाणे अधिकचे स्पष्टीकरण देण्यात आले आहे:-

दि.१४.०६.२००६ पूर्वी ज्या अध्यापकांनी सेवेत असताना एम.फिल.अर्हता धारण केली असेल, तसेच ज्या अध्यापकांनी दि.१४.०६.२००६ पूर्वी नियुक्तीवेळी एम.फिल अर्हता धारण केली होती, अशा अध्यापकांची नियुक्ती जर विहित निवड समितीच्या माध्यमातून झाली असेल तसेच अशा अध्यापकांना विद्यापीठ अनुदान आयोगाने एम.फिल अर्हतेच्या आधारे नेट परिक्षेमधून सूट देऊन त्यांच्या नावासहित तसे संबधित विद्यापीठांना कळविलेले असेल व विद्यापीठाने नियमित स्वरुपात मान्यता दिलेली असेल, तर (१)

ज्या अध्यापकांनी नियुक्तीपूर्वी एम.फिल अर्हता धारण केली असेल, त्यांना नियुक्तीपासून व (२) ज्यांनी सेवेत असताना एम.फिल. अर्हता धारण केली असेल, त्यांना सदर अर्हता धारण केल्याच्या दिनांकापासून कॅस अंतर्गत पदोन्नतीचे लाभ देय राहतील.

उपरोक्तप्रमाणे एम.फिल अर्हताधारक अध्यापकांना कॅसचे लाभ देण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात शिवभोजन योजना बंद पडण्याच्या स्थितीत असल्याबाबत

**(४) * १९६०० श्री.प्रवीण दटके, श्रीमती उमा खापरे, श्री.सचिन अहिर, श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गरीब लोकांना किमान दोन वेळचे पोटभर जेवण मिळावे या उद्देशाने, तत्कालीन शासनाने राज्यात शिवभोजन थाळी योजना सुरु केली असून सुमारे दोन लाख शिवभोजन थाळया दररोज उपलब्ध करून दिल्या जातात तसेच राज्यात १००० पेक्षा जास्त शिवभोजन केंद्रे कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेतील निकष व अटीनुसार शिवभोजन केंद्रात जेवणासाठी येणाऱ्या लाभार्थ्यांचे थाळीसह फोटो काढून वेबसाईटवर अपलोड करणे शासनाने केंद्रचालकांना बंधनकारक करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, एकाच लाभार्थ्याचे फोटो सातत्याने अपलोड करुन शासनाची दिशाभूल होत असल्याचे जिल्हा पुरवठा अधिकारी, सोलापूर यांचे लक्षात आल्यामुळे "लाभार्थ्यांचे फोटो अपलोड करा, अन्यथा शिवभोजन केंद्र बंद करु" अशा नोटीसा केंद्र चालकांना बजाविलेल्या असल्याचे दिनांक १० एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सोलापूर जिल्ह्यातील १३ शिवभोजन केंद्र चालकांची गेल्या ६ महिन्यांपासून देयके प्रलंबित असल्यामुळे केंद्र चालकांनी मा.पालकमंत्री, सोलापूर यांची भेट घेऊन शासनाकडे प्रलंबित असलेल्या देयकांची रक्कम अदा करण्याबाबत निवेदने दिली असल्याचे दिनांक १० एप्रिल,२०२३ रोजी निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुषंगाने योजनेच्या अंमलबजावणीत होत असलेला गैरप्रकार लक्षात घेऊन या योजनेच्या अटी-शर्ती व निकषांमध्ये बदल करण्यात येऊन ती चालू राहण्याचेदृष्टीने तसेच वेळीच देयकाची रक्कम मिळणेबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, तसेच सोलापूर येथील केंद्र चालकांचे प्रलंबित रक्कमेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ :** (१) हे खरे आहे.

राज्यातील गरीब व गरजू जनतेला सवलतीच्या दरात भोजन उपलब्ध करून देण्यासाठी शिवभोजन योजना अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचा शासन निर्णय क्र. -शाभोथा-

२०१९/प्र.क्र.५१/नापु-१७, दिनांक ०१ जानेवारी, २०२० अन्वये दिनांक २६/०१/२०२० पासून सुरु करण्यात आली असून सध्या राज्यात १५५४ शिवभोजन केंद्रे कार्यान्वित आहेत. तसेच सदर योजनेंतर्गत सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० या वेळेत भोजन उपलब्ध करुन दिले जाते.

(२) हे खरे नाही.

(३) हे अंशत: खरे आहे.

अन्न, नागरी पुरवठा विभागाचे परिपत्रक क्र. शाभोथा-२०२२/प्र.क्र.३३/नापु-१७, दिनांक ३०/०३/२०२२ मधील तरतुदींचे सोलापूर जिल्ह्यातील शिवभोजन केंद्र चालकांकडून पालन होत नसल्याचे आढळून आल्याने जिल्हा पुरवठा अधिकारी, सोलापूर यांचेकडून नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. मात्र लाभार्थ्यांचे थाळीसह फोटो अपलोड करा, अन्यथा शिवभोजन केंद्र बंद करू असे नमूद करण्यात आलेले नाही.

(४) व (५) हे अंशत: खरे आहे.

सोलापूर जिल्ह्यातील शिवभोजन केंद्र चालकांची मार्च, २०२३ अखेरची देयके अदा करण्यात आली असून एप्रिल, २०२३ व मे, २०२३ अखेरची शिवभोजन केंद्र चालकांची देयके अदा करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात मराठवाडा विभागामधील जिल्हा परिषदेच्या शाळांमधील केंद्र प्रमुख व मुख्याध्यापकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(५) * १८८३२ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या २१९८ शाळांसाठी ५९२ मुख्याध्यापकांची पदे मंजूर असून त्यापैकी ४०८ पदे भरलेली आहेत तर १८४ पदे मागील ५ वर्षांपासून रिक्त आहेत तसेच केंद्र प्रमुखाची १२८ पदे मंजूर असून त्यापैकी १०४ पदे भरलेली आहेत तर २४ पदे मागील ७ वर्षांपासून रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने वर्ग-२ च्या मुख्याध्यापकांना पदावनत करुन वर्ग-३ चा दर्जा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुख्याध्यापक हे शाळेचे प्रशासकीय काम करतात तर केंद्र प्रमुख हे शाळांना भेटी देणे, गुणवत्ता तपासणे, शैक्षणिक विषयाची वार्षिक तपासणीचे काम करत असल्याने दैनंदिन शैक्षणिक व व्यवस्थापनाची कामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या सर्व माध्यमिक शाळांसाठी सर्व भौतिक सोयींयुक्त टाईपप्लान करुन इमारती बांधण्यासाठी शासनाने कोणता निर्णय घेतलेला आहे,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने केंद्र प्रमुख व मुख्याध्यापकाची रिक्त असलेली पदे भरण्याबाबत तसेच माध्यमिक शाळांसाठी सर्व भौतिक सोयीयुक्त इमारती बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) अंशत: खरे आहे.

औरंगाबाद जिल्हा परिषदेच्या सन २०२०-२१ च्या संच मान्यतेनुसार ५९२ मुख्याध्यापकांची पदे मंजूर असून त्यापैकी ४०८ पदे भरलेली आहेत. जून, २०२३ मध्ये १३८ पदे पदोन्नतीने भरण्यात आली आहेत. तर उर्वरित पदे सन २०२२-२३ च्या संचमान्यतेनंतर भरण्याची तजवीज ठेवली आहे.

तसेच, केंद्र प्रमुखाची १२८ पदे मंजूर असून त्यापैकी ३० पदे भरलेली आहेत. तर उर्वरित पदे पदोन्नतीने व विभागीय परीक्षेद्वारे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(२) व (३) हे खरे नाही

(४) व (५) समग्र शिक्षांतर्गत शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमिक शाळांकरिता मंजूर असलेली बांधकामे टाईपप्लाननुसार करण्यात येतात.

तसेच, माध्यमिक शाळांसाठी सर्व भौतिक सोयीयुक्त इमारत बांधण्यासाठी आदर्श शाळा म्हणून विकास करावयाच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांना मोठ्या बांधकामासाठी निधी या योजनेंतर्गत रुपये ४,०२,९०,८५३/- इतका निधी वितरित करण्यात आला आहे.

तसेच, राजमाता जिजाऊ शैक्षणिक गुणवत्ता विकास अभियान (निजामकालीन शाळा) या योजनेंतर्गत औरंगाबाद जिल्ह्यातील शाळा बांधकामासाठी रुपये ८,८७,६९,०००/- निधी वितरित करण्यात आला आहे.

तसेच, केंद्रप्रमुख व मुख्याध्यापकांची रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्ह्यात आयटी पार्क उभारण्याबाबत

**(६) * १९७४० श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.अरुण लाड :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पंधरा दिवसांत राज्याचे नवीन माहिती तंत्रज्ञान धोरण जाहीर करण्यात येईल असे मा.उद्योग मंत्री यांनी दिनांक २२ मार्च, २०२३ रोजी वा त्यासुमारास सभागृहास आश्वस्त केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर चर्चेदरम्यान, कोल्हापूर येथे माहिती तंत्रज्ञान केंद्र उभारण्यासंदर्भात तसेच जळगांव येथे नाविन्यपूर्ण उद्योगावर आधारित प्रकल्प करण्यात येत असल्याने त्याबाबत माहिती व तंत्रज्ञान विषयातील तज्ञ, अन्य तज्ञ व संबंधित विभाग यांची बैठक घेण्यात येईल असेही मा.मंत्री महोदयांनी सभागृहास आश्वासित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोल्हापूर स्मार्ट सिटीच्या कक्षेत येत नसल्यामुळे आयटी धोरणाच्या निकषात समाविष्ट होऊ शकत नाही तसेच राज्याचे नवीन माहिती व तंत्रज्ञान धोरण अद्याप जाहीर न झाल्यामुळे माहिती व तंत्रज्ञान केंद्राबाबत अद्याप बैठकही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोल्हापूर येथे आयटी पार्क उभारण्यासंदर्भातील अडचणी दूर करणे, नवीन माहिती व तंत्रज्ञान धोरण जाहीर करुन माहिती व तंत्रज्ञान केंद्रासंदर्भात बैठक घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) राज्याच्या नवीन माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण-२०२३ चा मसूदा या क्षेत्रातील स्टेक होल्डर, तज्ञ, विविध संघटना, नामवंत उद्योजक यांचेसोबत वेळोवेळी केलेल्या बैठकीतील चर्चा व राज्याच्या १४ प्रशासकीय विभागांचे अभिप्राय प्राप्त करून घेऊन तयार करण्यात आला आहे.

सदर धोरणास मा.मंत्री मंडळाच्या दिनांक ३०/०५/२०२३ रोजी झालेल्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार राज्याचे नवीन माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण-२०२३ हे दिनांक २७/०६/२०२३ च्या शासन निर्णयान्वये जाहीर करण्यात आले आहे.

सदर धोरणांत राज्याच्या सर्वभागात माहिती तंत्रज्ञान उद्याने तसेच माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा घटक विकसित होण्याच्या अनुषंगाने विविध सवलती/प्रोत्साहने अनुज्ञेय करण्यात आली आहेत. सदर धोरणातील निकषानुसार कोल्हापूरसह राज्यातील कोणत्याही भागातील खाजगी विकासकाने माहिती तंत्रज्ञान उद्यान विकसित करण्यासाठी किमान २०००० चौ.फूट बांधीव क्षेत्रासाठी मंजूरी घेऊन आयटी पार्क विकसित करण्यासाठी परिपूर्ण प्रस्ताव जिल्हा उद्योग केंद्राकडे सादर केल्यास आयटी पार्क विकसित करण्याकरिता आवश्यक असणारी मंजूरी व इरादापत्र देण्याबाबतची कार्यवाही उद्योग संचालनालयामार्फत करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात शाळाबाह्य मुलांची संख्या वाढत असल्याबाबत

**(७) * १९८५७ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.आमश्या पाडवी, श्री.सुनिल शिंदे, श्री.सचिन अहिर, श्री.राजहंस सिंह, ॲड.निरंजन डावखरे, प्रा.राम शिंदे, श्री.निलय नाईक :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने सादर केलेल्या संच मान्यतेमुळे सुमारे २४ लाख विद्यार्थी शाळाबाहय तर ६० हजार शिक्षक अतिरिक्त ठरणार आहेत तसेच सन २०२२-२०२३ या शैक्षणिक वर्षात देशभरात ९ लाखांहून अधिक मुले-मुली शाळाबाह्य झाले असून यामध्ये राज्यातील ८,४७८ मुले आणि ७,२२८ मुलींचा समावेश असल्याचे माहे मे,२०२३ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पालघर जिल्हा परिषदेचे सुमारे ४१ वर्ग शिक्षकांअभावी बंद करण्याची वेळ उद्भवली असल्याने या शैक्षणिक वर्षात इयत्ता नववी व दहावीच्या तुकडीत जाणारे पाच हजारांपेक्षा अधिक विद्यार्थी शाळाबाह्य होण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पालघर जिल्हा परिषद मधून आंतर जिल्हा बदलीने इतर जिल्ह्यात शिक्षक वर्ग जात असल्यामुळे शंभर शाळा बंद होण्याच्या मार्गावर आहेत, तसेच शासनाच्या चुकीच्या धोरणामुळे पालघर जिल्ह्यात नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांना शिकविणाऱ्या शिक्षकांना मुदतवाढ न देण्याचा निर्णय जिल्हा परिषदेने घेतला असल्याने नववी व दहावीचे वर्ग बंद करण्याची वेळ आली असून ३०० पेक्षा जास्त शाळा एक शिक्षकी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या संचमान्यतेमुळे शिक्षण क्षेत्राचे नुकसान होणार असल्याचे मत शिक्षक क्षेत्रातील संघटना व्यक्त करीत असून शाळाबाह्य मुला-मुलींना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शिक्षण हक्क कायदा (आरटीई) समग्र शिक्षण योजना, बेटी बचाव, बेटी पढाव व मध्यान्ह भोजन यांसारख्या विविध योजना राबविल्या जात असतानांही लाखो मुले-मुली औपचारिक शिक्षण प्रवाहातून बाहेर असल्याचे चित्र उक्त आकडेवारीतून निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास,शासन योजना राबवित असतानाही राज्यात इतक्या मोठ्या प्रमाणात शाळाबाह्य मुले-मुली आढळून येण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने शाळाबाहय मुले-मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी व शाळांमधील विद्यार्थ्यांची गळती रोखण्यासाठी तसेच शासनाच्या योजना शाळाबाहय विद्यार्थ्यांपर्यंत पोहचाव्यात यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही.
(५) व (६) मिशन झिरो ड्रॉप आऊट अंतर्गत केलेल्या सर्वेक्षणामध्ये राज्यातील साधारणपणे ४६५० मुले व ४६७५ मुली असे एकूण ९३०५ बालके शाळाबाह्य आढळून आलेली होती. सदरची बालके संचमान्यतेमुळे शाळाबाह्य झालेली नसून पालकांचे स्थलांतरण व इतर कारणांमुळे शाळाबाह्य आढळून आली होती. त्यापैकी ९००४ बालकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यात आले आहे.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्तीबाबत

**(८) * १९३३३ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मॅट्रिकपूर्व अल्पसंख्याक शिष्यवृत्तीद्वारे विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या शिष्यवृत्तीपेक्षा अधिक खर्च होत असल्याने हजारो विद्यार्थ्यांचे आर्थिक नुकसान होत असल्याबाबतच्या तक्रारी येत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागासवर्गीय विद्यार्थ्यांसारखी अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना धनादेशाद्वारे शिष्यवृत्ती मिळण्यासंदर्भातील मागणीबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे,
(३) असल्यास, मॅट्रिकपूर्व अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी बँक खाते उघडून, उत्पन्नाचा दाखला घ्यावा लागतो तसेच या विद्यार्थ्यांना ऑनलाइन अर्ज करून प्रत्येक वर्षी नुतनीकरणासाठी नव्याने अर्ज करावा लागतो या सर्व अडचणी दूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) हे खरे नाही.
(२) व (३)प्रि-मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना ही १०० टक्के केंद्र पुरस्कृत योजना आहे. सदर योजनेच्या अटी व शर्ती केंद्र शासनामार्फत निश्चित केल्या जातात.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## समग्र शिक्षा अभियानांतर्गत विद्यार्थ्यांकरिता गणवेश खरेदी करण्याच्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत

**(९) * १९५९० श्री.आमश्या पाडवी, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.अनिकेत तटकरे, श्री.महादेव जानकर, श्री.प्रसाद लाड, श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या समग्र शिक्षा अभियानांतर्गत शासकीय व अनुदानित शाळांतील व प्रवर्गातील प्रत्येक विद्यार्थ्याला माहे जून, २०२३ या शैक्षणिक वर्षापासून शाळा सुरु होण्याआधीच दोन गणवेशाचे संच विद्यार्थ्यांना उपलब्ध होण्याबाबतची मागणी 'समर्थन' संस्थेने मा.मंत्री, शालेय शिक्षण, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, शिक्षण संचालकांकडे दिनांक २९ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनांद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासकीय शाळांमध्ये शिकणाऱ्या पहिली ते आठवीच्या सर्व विद्यार्थ्यांना मोफत गणवेश, बूट व काही शालेय साहित्य खरेदी करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असून शाळांसाठी संस्थांच्या स्तरावर करण्यात येणारी गणवेश खरेदी आता राज्य स्तरावर करण्याचा निर्णय शासनाने दिनांक ५ मे,२०२३ रोजी वा त्यासुमारास घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या शैक्षणिक वर्षापासून खुल्या गटातील विद्यार्थ्यांसाठी मोफत गणवेशाचे वाटप करण्यात येणार असून विद्यार्थ्यांना शालेय शिक्षण व शाळेत येण्यास प्रोत्साहन मिळण्यासाठी, वेळेत गणवेश उपलब्ध होण्यासाठी तसेच गणवेशाची रंगसंगती ठरविण्याची व गणवेश उपलब्ध करुन घेण्याची जबाबदारी स्थानिक पातळीवरच ठेवावी, राज्यस्तरावरुन गणवेश वाटपाचा पुनर्विचार करावा, प्रति विद्यार्थी दोन गणवेशासाठी ६०० रुपयांऐवजी १००० रुपयांचा निधी देण्यात यावा, अशा मागण्या विरोधी पक्षनेते, विधानसभा यांनी शासनाला केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर विचाराधीन प्रस्तावाकरिता किती निधीची तरतूद करण्यात आली आहे तसेच सदर गणवेश शिवण्याचा ठेका कोणत्या कंपनीस देण्यात आला आहे, या कंपनीस गणवेश शिवण्याकरिता किती मुदत /कालावधी देण्यात आली आहे,
(५) असल्यास, राज्य स्तरावर गणवेशाची प्रक्रिया पूर्ण करावयाची असल्याने त्यास तांत्रिक व प्रशासकीय मान्यता तथा निविदा प्रक्रियेस विलंब होणार असून राज्य स्तरावर गणवेश खरेदी करण्याबाबत निर्णय घेण्यामागची कारणे काय आहेत, तसेच त्याचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांना मोफत गणवेश देण्याबाबत घेतलेल्या निर्णयानुसार अंमलबजावणी होण्यासाठी कोणती कार्यवाही केली, वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.

शासकीय तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या इ.१ ली ते इ.८ वी मधील सर्व विद्यार्थ्यांना दोन गणवेश तसेच, एक जोडी बुट व दोन जोडी पायमोजे उपलब्ध करुन देण्याचा निर्णय दिनांक ०६ जुलै, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे. सदर योजनेचा लाभ शाळा व्यवस्थापन समितीव्दारे देण्यात येणार आहे.
(३) अंशत : खरे आहे.

प्रस्तुत विषयाबाबत मा.विरोधी पक्षनेते, विधान परिषद यांचे दिनांक १७ मे, २०२३ रोजी निवेदन शासनास प्राप्त झाले आहे. केंद्र शासनाच्या समग्र शिक्षा कार्यक्रमांतर्गत मार्गदर्शक सूचनांनुसार प्रति गणवेश रुपये ३००/- याप्रमाणे दोन गणवेशाकरीता रुपये ६००/- इतका दर निश्चित करण्यात आला आहे.
(४) मोफत गणवेश योजनेपासून वंचित राहणाऱ्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश योजनेचा लाभ देण्यासाठी रुपये ७५.६० कोटी व सर्व पात्र विद्यार्थ्यांना बुट व पायमोजे देण्यासाठी रुपये ८२.९२ कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे. सदर योजनेची अंमलबजावणी शालेय व्यवस्थापन समितीमार्फत करण्यात येणार आहे.
(५), (६) व (७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात मराठी शाळेतील विद्यार्थी संख्येत घट झाल्याबाबत

**(१०) * १९१४७ श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, डॉ. प्रज्ञा सातव :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मराठी माध्यमांच्या शासकीय शाळांतील विद्यार्थ्यांसाठी शासन कोट्यवधी रुपये खर्च करित असतानाही मराठी माध्यमाच्या विद्यार्थी संख्येत मोठी घट झाली असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अपुऱ्या शिक्षकांमुळे काही शाळांमध्ये अनेक वर्गांना एकच शिक्षक शिकवित असून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याने अनेक पालक आपल्या पाल्यांना ऐपत नसतानाही खाजगी शाळांमध्ये प्रवेश घेत असल्याने मराठी शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या कमी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सेमी इंग्रजी वर्ग, स्पोकन इंग्रजी धडे, विद्यार्थ्यांना टॅब अशा अनेक सोयी-सुविधा देऊनही महानगरपालिकेच्या व शासकीय मराठी माध्यमांच्या शाळांचे भवितव्य धोक्यात आले असून हिंदी व उर्दू माध्यमांच्या शाळेतील विद्यार्थ्यांच्या तुलनेत मराठी माध्यमांच्या विद्यार्थ्यांची संख्या कमी आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मराठी शाळेचा दर्जा सुधारण्यासाठी व शाळांतील विद्यार्थी संख्या वाढावी यासाठी कोणती उपाययोजना /कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) हे खरे नाही. राज्यातील मराठी माध्यमांच्या शाळांमध्ये सन २०२०-२०२१ मध्ये १ ली ते ८ वी मधील प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्या ९३,४१,८५८ इतकी असून, ती सन २०२१-२०२२ मध्ये ९४,५४, ९९६ इतकी झालेली आहे. सन २०२०-२०२१ च्या तुलनेत सन २०२१-२०२२ मध्ये विद्यार्थ्यांच्या संख्येत १,१३,१३८ इतकी वाढ झालेली आहे.
(२) शासनामार्फत पवित्र पोर्टल प्रणालीद्वारे शिक्षक भरतीची प्रक्रिया राबविण्याचे काम सुरु आहे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून शासनाने दिनांक ०७ जुलै, २०२३ च्या पत्रान्वये जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये सेवानिवृत्त शिक्षकांची कंत्राटी तत्त्वावर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करण्याचे निर्देश संबंधित कार्यालयांना दिले आहेत.
(३) हे खरे नाही. राज्यातील मराठी माध्यमांच्या शाळांमध्ये १ ली ते ८ वी मधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या संख्येत सन २०२०-२०२१ च्या तुलनेत सन २०२१-२०२२ मध्ये वाढ झालेली आहे.

इंग्रजी व हिंदी माध्यमांच्या शाळांमध्ये १ ली ते ८ वी मधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या संख्येत सन २०२०-२०२१ च्या तुलनेत सन २०२१-२०२२ मध्ये घट झालेली आहे.

उर्दु माध्यमांच्या शाळांमध्ये १ ली ते ८ वी मधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या संख्येत सन २०२०-२०२१ च्या तुलनेत सन २०२१-२०२२ मध्ये १४,८१९ इतकी वाढ झालेली आहे. या तुलनेत मराठी माध्यमांच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या संख्येत १,१३,१३८ इतकी वाढ झालेली आहे.
(४) मराठी प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांची पट नोंदणी व उपस्थितीचे प्रमाण वाढवण्यासाठी मोफत परिवहन सुविधा, मोफत गणवेश, मोफत पाठ्यपुस्तक, मध्यान्ह भोजन इ. योजना राबविण्यात येतात.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई विद्यापीठाने बीए तृतीय वर्षाच्या 'मानसशास्त्र' विषयाच्या परीक्षेचा सदोष निकाल जाहीर केल्याबाबत

**(११)** * **१८९३८ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाने बीए तृतीय वर्ष सत्र ५ च्या 'मानसशास्त्र' विषयाच्या परीक्षेतही १८ हून अधिक विद्यार्थ्यांना १०० गुण दिले असून एकाच महाविद्यालयामधील विद्यार्थ्यांना नापास करताना क्रमाने गुण दिल्याचे दिनांक २ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बीए तृतीय वर्ष सहाव्या सत्राची परीक्षा संपल्यानंतर जाहीर करण्यात आलेला निकाल सदोष असल्याने विद्यार्थ्यांमध्ये नाराजीची भावना पसरली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे चौकशीच्या अनुषंगाने सदोष निकाल जाहीर करून मुंबई विद्यापीठातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्याशी खेळणाऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१), (२) व (३) हे अंशतः खरे आहे.

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत काही महाविद्यालयांनी तृतीय वर्ष सत्र ५ च्या मानसशास्त्र या विषयाच्या नविन अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना जुन्या अभ्यासक्रमाच्या प्रश्नपत्रिका वितरित केल्यामुळे सदर विषय तात्पुरत्या स्वरुपात वगळून इतर विषयांचा निकाल दिनांक १५/०४/२०२३ रोजी घोषित करण्यात आला तद्नंतर सदरची बाब लक्षात घेऊन दिनांक २९/०४/२०२३ रोजी परीक्षा मंडळाने मंजूर केलेल्या ठरावानुसार उत्तरपत्रिका ऑफलाईन तपासून सदर विद्यार्थ्यांचे निकाल दिनांक २९/०४/२०२३ रोजी जाहीर केले आहेत. सदर निकाल परीक्षेनंतर ५ महिन्यांनी जाहीर झालेला आहे. परंतु, बी.ए. तृतीय वर्षे सत्र ५ च्या मानसशास्त्र या विषयाच्या ज्या विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका, उपस्थितीचा अहवाल तसेच पर्यवेक्षक अहवालमध्ये प्रश्नपत्रिका कोड, बार कोड तसेच आसन क्रमांक चुकीचा लिहिला होता, अशा विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका तपासून निकाल घोषित करताना संगणक प्रणालीवरील उत्तरपत्रिका तपासणी पध्दतीमध्ये गुण मिळणे कठीण होते. अशा ४ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे निकाल संगणक प्रणालीद्वारे शुन्य गुण दर्शवून राखीव दर्शविण्यात आले आहेत. याशिवाय या विषयात एकूण २७ विद्यार्थ्यांना १०० पैकी १०० गुण आणि ३८ विद्यार्थ्यांना थेअरी पेपर ८० पैकी ८० गुण दिल्याचे निदर्शनास आले आहे. जाहीर केलेल्या निकालात अशा त्रुटी आढळल्याने या प्रकरणी कुलगुरुंनी त्रिसदस्यीय चौकशी तथा तज्ञ समिती गठीत करुन या समितीच्या मार्गदर्शनाने त्रुटींचे निराकरण करून दिनांक ३०/०५/२०२३ रोजी मानसशास्त्र या विषयाचा सुधारित निकाल जाहीर करण्यात आला आहे. विद्यापीठाच्या चौकशी समितीच्या अहवालानुसार विद्यापीठाने संबंधितांकडून खुलासे मागविले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे शिरगाव (ता.मंडणगड, जि.रत्नागिरी) येथील शेतकऱ्यांच्या संपादित केलेल्या जमिनी शेतकऱ्यांना परत करण्याबाबत

**(१२) * १९९७६ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे शिरगाव (ता.मंडणगड, जि.रत्नागिरी) येथील शेतकऱ्यांच्या जमिनी सन २००५ मध्ये संपादित करून सोवेली पंचक्रोशी सहकारी औद्योगिक वसाहत मर्यादित या संस्थेस देण्यात येऊनही १८ वर्षांच्या

कालावधीत संपादित जमिनीवर कोणतेही बांधकाम न केल्याने संपादित जमिनी संबंधित शेतकऱ्यांना परत करण्यात याव्यात अशी लेखी मागणी मा.लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ०५ एप्रिल, २०२३ रोजी मा.उद्योगमंत्री यांच्याकडे केली असून याबाबत दिनांक ०१ मे, २०२३ रोजी संबंधित शेतकऱ्यांनी एक दिवसाचे लाक्षणिक उपोषण केले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ज्या प्रयोजनासाठी जमिनी संपादित करण्यात आल्या होत्या त्या प्रयोजनार्थ त्यांचा वापर करण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संपादित केलेल्या जमिनीवर अद्यापही कोणतेही बांधकाम केलेले नसल्याने सदर जमिनी संबंधित शेतकऱ्यांना परत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
सोवेली पंचक्रोशी सहकारी औद्योगिक वसाहत मर्यादित या संस्थेमार्फत २२ उद्योजकांना भूखंड वाटप करण्यात आले असून यासंदर्भात त्यांचेसोबत भाडेकरार केलेला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शिक्षणाधिकारी (माध्यमिक), अहमदनगर यांनी प्रतिज्ञापत्रात खोटी माहिती सादर केल्याबाबत

**(१३) * १९४४६ श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी यांनी आपल्या प्रतिज्ञापत्रात तीन अपत्ये नाहीत अशी खोटी माहिती सादर केल्यामुळे त्यांना शासनाने ५ महिने १७ दिवस बडतर्फ करून गुन्हा दाखल करण्याचे आदेश वरिष्ठ कार्यालयास दिले असूनही बडतर्फ शिक्षणधिकारी यांनी आता पुन्हा सेवेत दाखल होऊन अहमदनगरच्या माध्यमिक शिक्षणाधिकारी पदाचा कार्यभार घेऊन शासनाची फसवणूक केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने खोटी माहिती सादर करुन शासनाची फसवणूक करणाऱ्या शिक्षणाधिकारी यांचे निलंबन करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) व (२) तत्कालिन शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प.औरंगाबाद यांनी लहान कुटुंबाचे खोटे शपथपत्र सादर केल्यामुळे शासन सेवेतून बडतर्फ करण्यात आले होते. तद्नंतर संबंधितानी

केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम, २००५ मधील कलम ६ मधील तरतूदीनुसार शासनाच्या मान्यतेने पुन:शासन सेवेत दिनांक १८/०१/२०१८ च्या शासन आदेशान्वये शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सिंधुदूर्ग या पदी पदस्थापना देण्यात आली.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद-जळगाव दरम्यानच्या रस्त्याचे काम पूर्ण करण्याबाबत

**(१४) * १९८४२ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने सन २०१५ मध्ये औरंगाबाद-जळगाव रस्त्याचे काम केंद्र शासनाच्या योजनेतून राज्य शासनाच्या राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या देखरेखीत काम करण्याचा निर्णय घेऊन सन २०१६ मध्ये कामाला सुरुवात करण्यात आली होती, हे खरे आहे काय.
(२) असल्यास, सदर रस्त्याच्या कामाचे कंत्राट तेलंगणाच्या ऋत्विक प्रोजेक्टस प्रा.लि. या कंपनीस देण्यात येवून कंत्राटाधिन अटी व शर्तीनुसार रस्त्याचे काम सन २०१८ मध्ये पूर्ण करण्यात येणार असताना या रस्त्याचे काम अद्याप अपूर्ण असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे. हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रस्त्याचे काम अपूर्णावस्थेत असल्याने या रस्त्यादरम्यान जागतिक वारसा असणाऱ्या अजिंठा लेणीकडे येणाऱ्या पर्यटकांची व अभ्यासकांची संख्या घटली जाऊन त्यामुळे सुमारे ३० कोटींचे नुकसान झाल्याचेही त्याचसुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, नियोजित कालावधीपेक्षा ५ वर्षे अधिकचा काळ होऊनही तसेच सदर रस्त्याच्या एकूण लांबी १४७.३८ कि.मी.पैकी १०९.२५ कि.मी.लांबी म्हणजेच ८५% काम पूर्ण झाले आहे व उर्वरीत ३८ कि.मी. रस्त्याचे काम माहे डिसेंबर, २०२२ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन असतानाही अद्याप रस्त्याचे काम अपूर्ण राहण्याची कारणे काय आहेत,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने औरंगाबाद-जळगाव रस्त्याचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे नाही.

सदर रस्त्याचे काम माहे जून, २०१७ पासून सुरु करण्यात आले.
(२) अंशत: खरे आहे.

माहे जुलै, २०१७ मध्ये मा.केंद्रिय मंत्री, रस्ते वाहतूक व महामार्ग यांच्याकडून सदर रस्त्याचे काम दुपदरीकरणावरुन चौपदरीकरण करण्याची घोषणा करण्यात आली. सदर चौपदरीकरणाच्या प्रस्तावास केंद्रशासनाकडून मान्यता मिळण्यास दीड ते दोन वर्षाचा कालावधी लागला, या दरम्यान सदर काम बंद होते. या कामासाठी उप कंत्राटदाराची सन २०१९ च्या वर्षाअखेर नेमणुक करण्यात आली. १३.५५ कि.मी. लांबीतील भूसंपादन, वन विभागाची परवानगी, करोना महामारीमुळे कामास विलंब झाला आहे. एकूण

१४७.३८ कि.मी. पैकी १३३.५५७ कि.मी. लांबी पूर्ण झाली असून कामाची भौतिक प्रगती ९०.६० % एवढी झाली आहे. सद्य:स्थितीत उर्वरित काम प्रगतीपथावर आहे.
(३) या विभागाकडे सदर माहिती उपलब्ध नाही.
(४) सद्य:स्थितीत एकूण कामापैकी ९०.६०% काम पूर्ण झाले आहे. चौपदरीकरणाच्या प्रस्तावास केंद्रशासनाची मान्यता, भूसंपादन, वन विभागाची परवानगी, करोना महामारी इ. मुळे कामास विलंब झाला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे आक्षेपार्ह रॅप साँगचे चित्रिकरण केल्याबाबत

**(१५) * १८९७६ श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे सुट्टीच्या दिवशी आक्षेपार्ह रॅप साँगचे चित्रिकरण केले असून सदर चित्रिकरण करण्याकरिता विद्यापीठात एका तासाला २५ हजार रुपये शुल्क आकारले जात असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विद्यापीठात सुट्टीच्या दिवशी होत असलेल्या चित्रिकरणामुळे विद्यापीठाच्या सुरक्षाव्यवस्थेबाबत शंका निर्माण झाली असून सदर आक्षेपार्ह चित्रिकरणाप्रकरणी स्थानिक पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने या प्रकरणी संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे सुट्टीच्या दिवशी चित्रिकरण केले असल्याची बाब खरी आहे. तथापी सदर विद्यापीठात चित्रिकरण करण्यासाठी एका तासाला रुपये २५०००/- शुल्क आकारले जात असल्याची बाब खरी नाही.
(२) अंशत: खरे आहे. स्थानिक पोलीस ठाण्यात याबाबत तक्रार दाखल करण्यात आली आहे.
(३) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे विद्यापीठाने सत्यशोधन समिती गठीत केली असून सदर समितीच्या अहवालानुसार कारवाई प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## पैठण-पंढरपूर या राष्ट्रीय महामार्गाचे काम विहित मुदतीत पूर्ण करण्याबाबत

**(१६) * १९०९३ श्री.सुरेश धस :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाटोदा (जि.बीड) तालुक्यातून जाणाऱ्या पैठण- पंढरपूर या राष्ट्रीय महामार्गाचे काम अजूनही प्रलंबित असल्यामुळे तसेच चुंबळी फाटा ते पाटोदा शहरातील पूल व पारगाव याही रस्त्यांच्या प्रलंबित कामामुळे अपघातांचे प्रमाण वाढले असून प्रवाशांना आपले प्राण गमवावे लागले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पाटोदा शहरातील राष्ट्रीय महामार्ग व पुलावरील कामांमुळे नागरिकांना ये-जा करताना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर राष्ट्रीय महामार्गाचे काम विहित वेळेत पूर्ण न केल्यामुळे सदर ठिकाणी अपघात होऊन अनेकांचे मृत्यूही झाले आहेत त्याप्रकरणी संबंधित अधिकारी, कार्यकारी अभियंता व संबंधित एजन्सी यांच्यांवर सदोष मनुष्यधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १२ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित पैठण-पंढरपूर या राष्ट्रीय महामार्गाचे काम जलदगतीने पूर्ण करण्यासाठी तसेच सदर प्रकरणी संबंधित दोषींवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करणेबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) हे अंशत: खरे आहे.

सन २०२१ ते २०२३ या कालावधीमध्ये ५ अपघात झाले असून त्यामध्ये ५ जणांचा मृत्यू झालेला आहे. सदर अपघात वाहन चालकांचा निष्काळजीपणा व वाहनाची तीव्र गतीमुळे झाल्याचे पोलीस अहवालानुसार दिसुन येते.
(२) अंशत: खरे आहे.

पाटोदा शहरामधील पुलाचे शेजारी लागुन दोन्ही बाजुस कब्रस्तान, इलेक्ट्रीक डी.पी. व दुकानांचे गाळे आहेत. तसेच वळण रस्ता उपलब्ध होत नसल्यामुळे पुलाचे काम व काही लांबीमध्ये भूसंपादन प्रक्रिया पूर्ण न झाल्यामुळे महामार्गाचे काम रखडले आहे.
(३) सदर मागणीबाबतचे पत्र या विभागास प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राममाची (रामोशीवाडी) (ता.कोरेगाव, जि.सातारा) येथे वादळी पावसामुळे नुकसान झालेल्या वर्ग खोल्यांची दुरुस्ती करण्याबाबत

**(१७) * २००१५ श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राममाची (रामोशीवाडी) (ता.कोरेगाव, जि.सातारा) या शाळेत पहिली ते आठवीपर्यंतचे वर्ग असून दिनांक ५ जून,२०२२ रोजी वादळी पावसामुळे ३ वर्गखोल्यांचे पत्रे उडून गेल्यामुळे व भिंतीला तडे गेल्यामुळे या खोल्यांचे निर्लेखन करण्याचा प्रस्ताव दिनांक २४ जून, २०२२ रोजी तलाठी यांनी शिक्षणाधिकारी, प्राथमिक यांचेकडे पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शाळेत सध्या ३ वर्गखोल्या उपलब्ध असून ४ नवीन खोल्या बांधण्यासाठी निधी उपलब्ध करण्याबाबत ग्रामपंचायत रामोशीवाडी यांनी दिनांक १७ जानेवारी, २०२३ व दिनांक २७ फेब्रुवारी,२०२३ रोजी पत्र पाठविले आहे, त्याचप्रमाणे तेथील लोकप्रतिनिधींनी जिल्हा नियोजन आराखडा सन २०२२-२३ मधून ४ शाळा खोल्यांसाठी निधी उपलब्ध करण्याची मागणी दिनांक १७ एप्रिल, २०२३ रोजी करुनही जाणीवपूर्वक निधी उपलब्ध करुन देण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुषंगाने तेथील विद्यार्थ्यांची होत असलेली गैरसोय लक्षात घेता नवीन ४ वर्ग खोल्यांसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती उपाययोजना/ कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) अंशत: खरे आहे.

३ वर्गखोल्यांच्या निर्लेखनास दिनांक ०७ नोव्हेंबर, २०२२ च्या आदेशांन्वये मान्यता देण्यात आली आहे.

(२) व (३) ४ वर्गखोल्यांच्या बांधकामासाठी निधी उपलब्ध करण्याबाबत संबंधित ग्रामपंचायत व मा.लोकप्रतिनिधींनी मागणी केली होती. जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजना २०२३-२४ अंतर्गत ४ वर्गखोल्यांच्या बांधकामासाठी रुपये ४७.२८ लक्षची प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असून निधी उपलब्ध करून देण्याची तजवीज ठेवली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील कापूस तसेच रेशीम शेती व कापड उद्योगाला चालना देण्यासाठी नवीन वस्त्रोद्योग धोरणाच्या अंमलबजावणीबाबत

**(१८) * २०१३५ श्री.एकनाथराव खडसे, श्री.प्रसाद लाड : तारांकित प्रश्न क्रमांक १५९०७ ला दिनांक २३ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कापूस तसेच रेशीम शेती व कापड उद्योगाला चालना देण्यासाठी नवीन वस्त्रोद्योग धोरण राबविण्यात येणार असून त्यासाठी २५ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विदर्भातील कापूस उत्पादक क्षेत्रात नवीन वस्त्रोद्योग धोरणांतर्गत गुंतवणूक वाढविण्यासाठी व पाच लाख रोजगाराच्या निर्मितीस मान्यता मिळविण्याकरिता महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग विकास महामंडळाची स्थापना करण्याची मागणी राज्यातील वस्त्रोद्योग क्षेत्रातील व्यावसायिक. राज्य जनप्रतिनिधी, सेवाभावी संघटना यांनी मा.मंत्री (वस्त्रोद्योग) यांच्याकडे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नवीन वस्त्रोद्योग धोरणाद्वारे लघु उद्योजक, शेतकरी तसेच ग्रामीण युवकांना रोजगाराच्या संधी निर्माण होणार असल्याने कोणता धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने ऊसाप्रमाणे कापूस, रेशीम हमीभाव/दर निश्चिती करण्यासंदर्भात तसेच नवीन वस्त्रोद्योग धोरणाच्या अंमलबजावणीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) होय हे अंशतः खरे आहे.

शासन निर्णय दिनांक ०२/०६/२०२३ अन्वये राज्याचे नवीन एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८ जाहीर करण्यात आले असून या धोरणान्वये पुढील पाच वर्षात राज्यामध्ये २५००० कोटी रुपयांची गुंतवणूक आकर्षित करुन पाच लाखापर्यंत रोजगार निर्मितीचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.

(२) विदर्भातील कापूस उत्पादक क्षेत्रात नवीन वस्त्रोद्योग धोरणांतर्गत गुंतवणूक वाढविण्यासाठी व पाच लाख रोजगाराच्या निर्मितीस मान्यता मिळविण्याकरिता महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग विकास महामंडळाची स्थापना करण्याची राज्यातील वस्त्रोद्योग क्षेत्रातील व्यावसायिक, राज्य जनप्रतिनिधी, सेवाभावी संघटना यांनी मा.मंत्री (वस्त्रोद्योग) यांना सादर केलेले निवेदन शासनास प्राप्त नाही.

तथापी, शासन निर्णय दिनांक ०२/०६/२०२३ अन्वये जाहीर केलेल्या वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८ नुसार महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग विकास महामंडळ स्थापन करण्याबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे.

(३) नवीन वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८ अंतर्गत सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांच्या स्थिर भांडवली गुंतवणुकीवर भांडवली अनुदान स्वरुपात झोननुसार ३० ते ४५ टक्के इतके वित्तीय सहाय्य तसेच रुपये २.०० ते ३.७७ पर्यंत वीज अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

तसेच, या धोरणांतर्गत पुढील पाच वर्षात २५००० कोटी रुपयांची गुंतवणूक आकर्षित करुन पाच लाखापर्यंत रोजगार निर्मितीचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.

(४) कापूस, रेशीम यांची दरनिश्चिती मागणी व पुरवठ्यानुसार खुल्या बाजारात निश्चित होते.

नवीन वस्त्रोद्योग धोरणाच्या अंमलबजावणीबाबत आवश्यक ती कार्यवाही शासन स्तरावरून सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बीड आणि हिंगोली जिल्ह्यातील काही केंद्रामधील १२ वीच्या भौतिकशास्त्राच्या उत्तरपत्रिकांमध्ये एकाच व्यक्तीचे हस्ताक्षर असल्याबाबत

**(१९) * २०२१६ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड आणि हिंगोली जिल्ह्यातील काही परीक्षा केंद्रामधील बारावीच्या भौतिकशास्त्राच्या ३७२ उत्तरपत्रिकांमध्ये एकाच व्यक्तीचे हस्ताक्षर असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्याकरिता नेमलेल्या चौकशी समितीचा अहवाल प्राप्त झाला असून त्यामध्ये एकाच व्यक्तीचे हस्ताक्षर असल्याचे नमुद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने जबाबदार असणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) सदर प्रकरणी संबंधित दोन्ही परीक्षक प्रथम दर्शनी दोषी दिसून आल्याने त्यांचेविरुध्द पोलीस स्टेशन फर्दापूर ता.सोयगाव जि.औरंगाबाद येथे फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## समग्र शिक्षा योजनेंतर्गत करार तत्वावरील कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ देण्याबाबत

**(२०) * २०२८३ श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे : तारांकित प्रश्न क्रमांक १७१२९ ला दिनांक १३ मार्च, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) समग्र शिक्षा योजनेंतर्गत सन २००५-०६ पासून निव्वळ करार तत्वावर ५५०० पेक्षा अधिक कर्मचारी विविध संवर्गात कार्यरत असून या कर्मचाऱ्यांना मागील १८ - २० वर्षांपासून तुटपुंजे मानधन दिले जात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कार्यालयात रिक्त असणाऱ्या इतर पदांचाही अतिरिक्त कामाचा भार करार तत्वावर असणाऱ्या कर्मचाऱ्यांवर येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, भारत सरकारच्या धोरणानुसार करार कर्मचारी यांच्या मानधनात दरवर्षी १०% नैसर्गिक वाढ मंजूर करणे नियमानुसार बंधनकारक असताना सन २०१७-१८ पासून ते आजपर्यंतच्या काळात या करार तत्वावरील कर्मचाऱ्यांच्या मानधनात एकही पैसा नैसर्गिक वाढ झाली नाही तसेच राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांनी कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मानधन वाढीचा सादर केलेला प्रस्ताव नियोजन विभाग व वित्त विभागाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, नियोजन व वित्त विभागास कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मानधन वाढीबाबत सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली आहे काय, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुषंगाने करार तत्वावरील कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) व (४) हे अंशत: खरे आहे.

केंद्र शासनाने समग्र शिक्षा योजनेंतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या १० टक्के वाढीव मानधनाचा भार स्विकारण्यास मंजूरी दिलेली नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बडनेरा रोड (जि.अमरावती) औद्योगिक सहकारी वसाहत संस्थेत गैरव्यवहार करणाऱ्या संचालक मंडळावर कारवाई करण्याबाबत

**(२१) * २०५०४ डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बडनेरा रोड (जि.अमरावती) औद्योगिक सहकारी वसाहत संस्था र.न. ८४१५/१९६१ सातुर्णा या संस्थेने औद्योगिक प्रयोजनासाठी आरक्षित असलेल्या जागेच्या विकासासाठीच्या निविदेत गैरव्यवहार केल्याचे तसेच येथील १४७ पैकी १३ टक्के प्लॉट अनुसूचित जाती व जमातीच्या उद्योजकांसाठी आरक्षित असतानाही हे प्लॉट खुल्या वर्गातील उद्योजकांना हस्तांतरित केले असल्याची बाब माहे जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुषंगाने संस्थेच्या खुल्या जागेवर झालेल्या अतिक्रमणाकडे, गैरव्यवहार व अनियमिततेकडे दुर्लक्ष करणाऱ्या संस्थेच्या दोषी संचालक मंडळावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) हे खरे नाही.
(२) सदर औद्योगिक सहकारी वसाहत संस्थेने महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र यांची पूर्वपरवानगी न घेता एका खुल्या भूखंडावर वाणिज्यीक विकास कामाचा प्रस्ताव तयार करून निविदा प्रसिध्द केलेली होती. तथापि, उद्योग संचालनालयामार्फत सदर संस्थेला औद्योगिक प्रयोजनार्थ खुली जागा हस्तांतरीत केलेली असल्याने महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, अमरावती यांनी संस्थेच्या निविदा प्रक्रियेस व वाणिज्यीक विकास कामाला स्थागिती दिली आहे. तसेच सदर बाब जिल्हाधिकारी, अमरावती यांच्या निदर्शनास आणून दिली आहे.

सदर संस्थेच्या खुल्या जागेवर झालेल्या अतिक्रमणाबाबत महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, अमरावती यांना अवगत झाल्यानंतर सदर अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही करण्याबाबत आयुक्त, अमरावती महानगरपालिका व पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांना कळविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात नवीन शैक्षणिक धोरणानुसार येत्या शैक्षणिक वर्षापासून अभियांत्रिकी व वैद्यकीय शिक्षण मराठीमध्ये शिकविले जाणार असल्याबाबत

**(२२) * २०५४८ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामदास आंबटकर, श्री.निलय नाईक, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नवीन शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्यांना मातृभाषेतून शिक्षण उपलब्ध करून देण्याचा पर्याय देण्यात येणार असून त्यासाठी विज्ञान आणि वाणिज्य शाखेतील पुस्तके मराठीतून भाषांतर करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे माहे एप्रिल, २०२३ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवीन शैक्षणिक धोरण येत्या शैक्षणिक वर्षापासून लागू होणार असून अभियांत्रिकी व वैद्यकीय शाखेचे शिक्षण यापुढील काळात मराठीमध्ये शिकविले जाणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या नवीन शैक्षणिक धोरणानुसार मराठी माध्यमातून वैद्यकीय शिक्षण व अभियांत्रिकी शिक्षण शिकविण्यासाठी कृती आराखडा तयार करण्यात आला असून त्यास शासनाने मंजूरी दिली आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नवीन शैक्षणिक धोरणाच्या कृती आराखड्यास मंजुरी देऊन नवीन शैक्षणीक धोरण अंमलात आणण्याच्या दृष्टीने कोणती उपाययोजना/ कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) होय.

(२) होय.

(३) होय,

वैद्यकीय शिक्षण विभागा अंतर्गत आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमाच्या पाठ्यपुस्तकांचे मराठीत भाषांतर करण्याकरीता राज्यस्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे. तसेच अभियांत्रिकी व उच्च शिक्षण संस्थामधील विविध अभ्यासक्रमांच्या क्रमिक पुस्तकांचे मराठी भाषेमध्ये भाषांतर करण्यासाठी आयआयटी-मुंबई व उच्च व तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन यांचेमार्फत दि.०५.०१.२०२३ रोजी सामंजस्य करार करण्यात आला आहे.

(४) प्रादेशिक भाषेतून शिक्षणाची तरतूद नवीन शैक्षणिक धोरण २०२० मध्ये आहे. यानुसार पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी प्रश्नांची प्रादेशिक भाषेतून उत्तरे देण्याची तरतूद आहे. तसेच महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या नियामक परिषदेने शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून व त्यापुढील वर्षासाठी अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थांना प्रथम वर्ष प्रवेशित विद्यार्थ्यांकरिता अध्यापनाच्या प्रक्रियेची अंमलबजावणी ऐच्छिक स्वरुपात मराठी माध्यमातून राबविण्यास मान्यता दिलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

## राज्यातील शाळांमध्ये मराठी विषयाचे मूल्यमापन गुणांच्याऐवजी श्रेणी स्वरूपात करण्याच्या निर्णयाचा पुनर्विचार करणेबाबत

**(२३) * २०६८० श्री.सत्यजीत तांबे : तारांकित प्रश्न क्रमांक १८०७९ ला दिनांक ६ मार्च, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने राज्य शिक्षण मंडळाव्यतिरिक्त अन्य मंडळांच्या शाळांमध्येदेखील (सीबीएससी,आयसीएससी, आयबी,एसएससी,एचएससी) मराठी भाषा शिकवणे आणि शिकणे सक्तीचे करण्याबाबत दिनांक ९ मार्च, २०२० रोजीच्या शासन अधिसूचनेनुसार कायद्यात तरतूद केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अन्य मंडळांच्या शाळांना मराठी भाषा विषय सक्तीचा करुन ३ वर्षे होऊनही ज्या शाळांमध्ये अद्यापही अंमलबजावणी झालेली नाही अशा शाळांवर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने सदर शासन निर्णयात बदल करून शाळांमध्ये मराठी विषयाचे मूल्यमापन गुणांच्या ऐवजी श्रेणी स्वरूपात करण्याचा निर्णय घेतल्याचे माहे एप्रिल, २०२३ वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मराठी विषयाचे मूल्यमापन गुणांच्याऐवजी श्रेणी स्वरूपात करण्याच्या निर्णयामुळे राज्य शिक्षण मंडळ वगळता इतर शिक्षण मंडळाचे विद्यार्थ्यांचा मराठी विषयाचा पायाच कच्चा राहण्याची शक्यता असल्याने उक्त निर्णयासंदर्भात शासन पुनर्विचार करणेसंबंधीचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मराठी विषयाचे मूल्यमापन करताना गुणांच्याऐवजी श्रेणी स्वरूपात करण्याची कारणे काय आहेत तसेच उक्त निर्णयासंदर्भात पुनर्विचार करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) हे खरे आहे. शासन निर्णय दिनांक ०१ जून, २०२० नुसार राज्यातील सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये मराठी विषय हा सक्तीचा करण्यात आलेला आहे. सदर निर्णयाची अंमलबजावणी सन २०२०-२१ पासून इयत्ता पहिली व सहावी पासून टप्या-टप्याने सुरु करण्यात आली आहे.
(२) हे खरे नाही. याबाबतची तक्रार प्राप्त झालेली नाही.
(३), (४) व (५) राज्य अभ्यासक्रमाच्या व्यतिरिक्त इतर परीक्षा मंडळांच्या विद्यार्थ्यांना मराठी विषयाच्या अध्ययनामध्ये व पर्यायाने संपादणूकीमध्ये अडचणी आल्याचे लोकप्रतिनिधी, मुख्याध्यापक व पालक यांनी समक्ष भेटून तसेच निवेदनाद्वारे निदर्शनास आणून दिले होते.

यानुषंगाने राज्य मंडळाच्या शाळांव्यतिरिक्त इतर परीक्षा मंडळाच्या शाळांमध्ये सन २०२३-२४ पासून फक्त पुढील तीन वर्षापर्यंत इयत्ता ८, ९ व १० वी वर्गामध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे मराठी विषयाचे मुल्यांकन करतांना श्रेणी स्वरुपात (अ, ब, क, ड) करण्याबाबतचा निर्णय दिनांक १९ एप्रिल, २०२३ च्या शासन निर्णयाद्वारे घेण्यात आला आहे. सदर निर्णय फक्त एकाच बॅचला लागू आहे.

राज्यातील सर्व परीक्षा मंडळाच्या शाळांमध्ये मराठी भाषेचे अध्यापन व अध्ययन सक्तीचे आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई विद्यापीठाच्या दूर व मुक्त अध्ययन संस्थेच्या हॉल तिकीटातील चुकीमुळे विद्यार्थ्यांना परीक्षा देता आली नसल्याबाबत

**(२४) * २०४१० ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाच्या दूर व मुक्त अध्ययन संस्थेच्या (आयडॉल) परिक्षेसाठी आयडॉलकडून झालेल्या हॉल तिकीटातील चुकीमुळे महावीर जयंतीच्या सुट्टीच्या दिवशी विद्यार्थी परीक्षा केंद्रावर परीक्षेसाठी गेले असता संबंधित पेपर हा आदल्या दिवशीच झाल्याने अनेक विद्यार्थ्यांना परीक्षा देता न आल्याची बाब माहे एप्रिल, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तृतीय वर्ष कला शाखेचा मंगळवारी राज्यशास्त्र विषयाचा पेपर असून परीक्षा कक्षात समाजशास्त्र विषयाची नोंद करण्यात आली असल्याने अनेक विद्यार्थ्यांना मानसिक त्रास झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने सदर परिक्षेच्या गोंधळास कारणीभूत असणाऱ्यां संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली तसेच परीक्षा बुडालेल्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याबाबत त्या दिवसाची परीक्षा घेण्याबाबत कोणती उपाययोजना /कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

मुंबई विद्यापीठाच्या दूर व मुक्त अध्ययन संस्थेच्या हिवाळी सत्राच्या परीक्षा मार्च, २०२३ मध्ये सुरु झाल्या होत्या. तृतीय वर्ष बी.ए. च्या परीक्षेचे हॉल तिकीट दिनांक १९ मार्च, २०२३ रोजी विद्यार्थ्यांच्या लॉगिन मध्ये देण्यात आले होते. त्यावेळी काही तांत्रिक कारणास्तव दिनांक ०४ एप्रिल, २०२३ रोजी ‘महावीर जयंती’ या सुट्टीच्या दिवशी पेपर दाखविण्यात आला होता.हि चूक लक्षात आल्यानंतर दिनांक २६ मार्च, २०२३ रोजी सुधारित हॉल तिकीट विद्यार्थ्यांना देण्यात आले होते व तसा विद्यार्थ्यांना एस.एम.एस. ही पाठविण्यात आला होता.यानुसार दिनांक ०३ एप्रिल, २०२३ रोजी तृतीय वर्ष बी.ए. चा शेवटचा पेपर घेण्यात आला. ज्या विद्यार्थ्यांनी सुधारित हॉल तिकीट डाऊनलोड केले नाही असे विद्यार्थी हजारीमल सोमाणी महाविद्यालय गिरगाव चौपाटी, मुंबई येथे दिनांक ०४ एप्रिल, २०२३ रोजी ‘महावीर जयंती या सुट्टीच्या दिवशी पोहोचले होते. त्यामुळे या विद्यार्थ्यांना पेपर देता आला नाही.
(२) हे अंशतः खरे आहे.

मुंबई विद्यापीठाच्या दूर व मुक्त अध्ययन संस्थेच्या तृतीय वर्ष बी.ए. च्या परीक्षा मार्च, २०२३ पासून सुरु झाल्या होत्या. दिनांक २१ मार्च, २०२३ रोजी विद्यापीठातील विद्यानगरी परिसरातील परीक्षा केंद्रावर काही तांत्रिक चुकीमुळे परीक्षा केंद्राच्या बाहेर समाजशास्त्र विषयाची नोंद झाली होती. परंतु

विद्यापीठाने ती चूक तात्काळ दुरुस्त करीत विद्यार्थ्यांना त्यांच्या हॉल तिकिटावर असलेल्या विषयानुसार त्यांना पेपर देण्यात आले. यामुळे येथे कोणताही गोंधळ झालेला नाही. ज्या विद्यार्थ्यांचा राज्यशास्त्र विषयांचा पेपर होता त्यांना त्याच विषयाचा पेपर देण्यात आला.
(३) ज्या तृतीय वर्ष बी.ए. च्या विद्यार्थ्यांचा दिनांक ०३ एप्रिल, २०२३ रोजीचा पेपर बुडालेला आहे. अशा विद्यार्थ्यांचा पेपर पुन्हा घेण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला असून त्यानुसार विद्यापीठ स्तरावर कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील विनाअनुदानित व अंशत: अनुदानित शाळा/कमवि मधील अतिरिक्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या समायोजनाबाबत

**(२५) * १९४३० श्री.किरण सरनाईक : तारांकित प्रश्न क्रमांक १७२२६ ला दिनांक २७ फेब्रुवारी, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विनाअनुदानित व अंशत: अनुदानित शाळा/कमवि मधील अतिरिक्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे समायोजन फक्त विना किंवा अंशत: अनुदानित शाळा /कमवि मध्येच होत असल्याने बऱ्याच वेळेस सदर समायोजन होणे अशक्य असल्याचे माहे मे, २०२३ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विशेषत: मुंबईत मराठी शाळा बंद होत असल्याने ३०० पेक्षा जास्त शिक्षक अतिरिक्त तसेच मुंबईतील खाजगी अनुदानित शाळांतील ३०० हून अधिक मराठी माध्यमातील शिक्षक अतिरिक्त झाले असून मराठी माध्यमाच्या अतिरिक्त शिक्षकांची संख्या इतर माध्यमांपेक्षा अधिक असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार विनाअनुदानित व अंशत: अनुदानित शाळा/कमवि मधील अतिरिक्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे समायोजनाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) मुंबईमधील खाजगी अनुदानित शाळांमधील अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांपैकी एकूण २५७ शिक्षकांचे माहे जून, २०२३ मध्ये महानगरपालिकेच्या शाळांमध्ये तात्पुरते समायोजन करण्यात आले आहे. राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील अतिरिक्त ठरलेल्या अंशत: अनुदानित शिक्षकांचे वेतनाच्या समान टप्प्यावर समायोजन करणेबाबत शासन निर्णय दिनांक १२/१२/२०२२ निर्गमित करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठामधील रिक्त पदे भरण्याबाबत

**(२६) * १८८४० श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात शिक्षकांची २८९ पदे मंजूर असून शिक्षकेतरची ७७७ मंजूर पदांपैकी शिक्षकांची १५२ पदे तर शिक्षकेतराची ४२६ पदे भरली असून शिक्षकांची १३६ तर शिक्षकेतराची ३५१ पदे मागील १० वर्षांपासून रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने १ वर्षापुर्वी शिक्षकांची फक्त ७३ पदे भरणेस परवानगी दिली होती, परंतु विद्यापीठ प्रशासनाने अद्याप बिंदु नामावली करुन न घेतल्याने सदर भरती प्रक्रिया प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विद्यापीठ व अनुदानित महाविद्यालयातील ५० टक्के प्राध्यापकांची पदे रिक्त असल्याने शैक्षणिक कामे व पेपर तपासणी करणे इ. कामे करताना अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेतर पदांची भरती करण्याबाबत कोणती कार्यवही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील शिक्षकीय व शिक्षकेतर पदे रिक्त आहेत हे खरे आहे.
(२) डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील रिक्त पदांच्या ८० टक्के म्हणजेच ७३ पदे भरण्यास दिनांक १६ नोव्हेंबर, २०२२ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर पदे भरण्यासाठी बिंदूनामावली तपासून मान्यता देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) हे अंशत: खरे आहे.
(४) डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ येथील ७३ शिक्षकीय पदे भरण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार पदभरतीची पुढील कार्यवाही विद्यापीठाकडून करण्यात येत आहे. विद्यापीठातील अत्यावश्यक शिक्षकेतर पदे भरण्यास मान्यता देण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पिळंझे (ता.भिवंडी, जि.ठाणे) ग्रामपंचायत हद्दीतील भवरपाडा ते नंबर पाडादरम्यानच्या पुलाचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे केल्याबाबत

**(२७) * १९९१८ श्री.आमश्या पाडवी :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिळंझे (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील ग्रामपंचायत हद्दीत असलेल्या भवरपाडा ते नंबर पाडादरम्यान सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे सुमारे १ कोटी ७२ लाख रुपये खर्च करुन बांधण्यात आलेल्या पुलाचे बांधकाम अत्यंत निकृष्ट दर्जाचे असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अल्पावधीतच सदरहू पुलाच्या प्लास्टरला तडे जाणे, ठेकेदाराने काँक्रिट कामासाठी रेतीऐवजी स्टोन ग्रीड पावडर वापरण्यात आली असून वाहुन गेलेल्या जोड रस्त्याच्या कामात काँक्रिट भिंत उभारण्याचे नमूद असतानाही ठेकेदाराने त्या ठिकाणी दगडाचा वापर करुन निकृष्ट दर्जाच्या भिंतीचे बांधकाम केलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू पुलाचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे केल्याने पिळंझे, देपोली, साखरोली या महसुली गावांसह १५ आदिवासी पाड्यातील आदिवासी जनतेला रहदारी करणे गैरसोयीचे होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणात सा.बां.विभागाचे अधिक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता, उप अभियंता, कनिष्ठ अभियंता आणि ठेकेदार यांनी संगनमताने भ्रष्टाचार करुन कोट्यवधी रुपयांच्या शासकीय निधीचा गैरव्यवहार केलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुषंगाने निकृष्ट दर्जाचे बांधकाम करणाऱ्या ठेकेदार व सार्वजनिक बांधकाम विभागातील गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) दिनांक १६/०१/२०२३ रोजीच्या वृत्तपत्रात बातमी प्रसिध्द झाली होती.
(२) अधीक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, कोकण भवन यांचेमार्फत चौकशी आदेशित करण्यात आली आहे.
(३) सदर पुलावरून वाहतूक सुरु आहे.
(४) व (५) अधीक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, कोकण भवन यांचेकडून चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर अहवालातील निष्कर्षानुसार पुढील कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मरोळ (अंधेरी) औद्योगिक क्षेत्रामधील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील घरांचा ताबा घुसखोरांनी बेकायदा घेतल्याबाबत

**(२८) * १८९३३ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सारीपुत्रनगर,अंधेरी (पूर्व) येथील मरोळ औद्योगिक क्षेत्रामधील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत सुमारे ४०० घुसखोरांनी विकासकाशी संगनमत करून बेकायदा घरांचा ताबा घेतला असल्याची बाब दिनांक १८ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे आणि सदरहू झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील घुसखोर आणि विकासकांवर कठोर कारवाई करून गेली अनेक वर्षे हक्काच्या घरांपासून वंचित असलेल्या मूळ झोपडीधारकांना सदनिका देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या मरोळ औद्योगिक क्षेत्रातील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील विनासोडत वापरात असलेल्या पॉकेट क्र. ५ येथील इमारत क्र. १ व इमारत क्र. २, पॉकेट क्र. ३ इमारत क्र. ५ येथील सदनिकांचे संयुक्त सर्वेक्षण video चित्रीकरणाद्वारे करुन प्रत्यक्ष वास्तव्य करीत असलेल्या एकूण २३९ व्यक्तिस दिनांक २८/०३/२०२३ व ३१/०३/२०२३ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली. सदर कालावधीमध्ये एकूण ४६ व्यक्ती सुनावणीकरिता उपस्थित राहिले व त्यांच्याजवळील उपलब्ध दस्ताऐवज महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास सादर केले. तदनंतर अनुपस्थितीत राहिलेल्या सदनिकाधारकांकरिता स्थानिक वृत्तपत्रात जाहीर सूचना दिनांक ०७/०६/२०२३ रोजी प्रकाशित करण्यात आली होती. सदरहू जाहीरसुचने नंतर एकूण १७ व्यक्तींनी महामंडळाकडे उपस्थित राहून दस्ताऐवज सादर केले. सादर केलेल्या एकूण ६३ सदनिकांच्या दस्तऐवजांची मंजूर परिशिष्ट २ नुसार छाननी सुरु असून अंतिम निर्णयानंतर पुढील कार्यवाही प्रस्तावित आहे.

(२) विकासकाने झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत केलेल्या अनियमिततेचे निराकरण विकासकामार्फत करणेचे योग्य ती कार्यवाही सुरु असून, त्यानुसार विकासकाकडून पूर्तता न झाल्यास, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून विकासकावर यथोचित कारवाई करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ऐरोली, नवी मुंबई येथे मराठी भाषा उपकेंद्र उभारण्याबाबत

**(२९) * १९८३५ श्री.विक्रम काळे : तारांकित प्रश्न क्रमांक १८३८७ ला दिनांक २० मार्च, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चर्नीरोड, मुंबई येथे मराठी भाषा भवन तर नवी मुंबईतील ऐरोली येथे मराठी भाषा उपकेंद्र उभारण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवी मुंबईतील ऐरोली येथील मराठी भाषा उपकेंद्रासाठी सिडकोकडून हस्तांतरित करण्यात आलेला भूखंड शासनाने ताब्यात घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने या उपकेंद्रासाठी किती खर्च अपेक्षित आहे व सदर उपकेंद्राचे स्वरुप काय राहणार आहे व त्याबाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) मराठी भाषा भवन, उपकेंद्र, ऐरोली या इमारतीचे आराखडे सुधारित करण्याची प्रक्रिया सुरु आहे. सुधारित आराखड्यांनुसार महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून बांधकाम खर्चाचे जे ढोबळ अंदाजपत्रक प्राप्त होईल त्यास विहीत कार्यपध्दतीने शासनमान्यता घेण्यात आल्यानंतर प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

सदर नियोजित इमारतीमध्ये महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. तसेच अभ्यासिका, ग्रंथालय, विज्ञान केंद्र, ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्र, प्रेक्षागृह असणार आहे. त्याचबरोबर सदर इमारतीमध्ये साहित्यिक व विभागाच्या अधिनस्त विविध समितीतील सदस्यांकरिता निवास व्यवस्था करण्यात येणार असून भाषा संचालनालयाच्या कोकण भवन येथील कार्यालयास सदर इमारतीमध्ये जागा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील अनेक शाळांनी शैक्षणिक वर्षाचे शुल्क एकदाच भरण्याच्या सूचना पालकांना दिल्याबाबत

**(३०) * १८९७७ श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनेक शाळांनी सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षाचे शुल्क एकाच वेळी पूर्ण भरण्याच्या सूचना पालकांना दिल्या असून पूर्ण शुल्क न भरल्यास त्यांचा निकाल, तसेच प्रवेशही देण्यात येणार नसल्याचे माहे एप्रिल,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने शाळांच्या मनमानी कारभाराबाबत कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत

**(३१) * २०१४५ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण आणि शहरी भागात सुशिक्षित तरुण- तरुणींची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत असून राज्यात उद्योग, व्यवसाय संबंधित रोजगार, स्वयंरोजगारच्या नवीन संधी निर्माण करण्यासाठी राज्यातील तरुणांना स्वावलंबी तसेच आत्मनिर्भर बनविण्यासाठी तरुणांच्या सृजनशीलतेला, उद्योजकतेला वाव देण्यासाठी शासनाने अत्यंत महत्त्वाकांक्षी अशी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजना (Chief Minister Employment Generation Programme २०२३) संपूर्ण राज्यात राबविण्यात येत आहे,

परंतु नवीन उद्योजकांना कर्ज उपलब्ध करुन देण्यास बँकांनी नकार दिला असून जळगाव जिल्ह्याच्या सर्वेक्षणानुसार २००० प्रस्ताव नाकारले गेल्यामुळे बेजरोजगारांना आर्थिक, मानसिक, शारिरीक स्थितीला सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी नवीन उद्योजकांना कर्ज उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) हे खरे नाही.

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम ही योजना दिनांक ०१/०८/२०१९ पासून राज्यात राबविण्यात येत आहे. सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात जळगाव जिल्ह्याकरिता ८५० एवढा लक्षांक निश्चित करण्यात आला असून जिल्हा कार्यबल समितीमार्फत (DLTFC) एकूण १८०१ कर्ज प्रस्ताव विविध बँकांना सादर करण्यात आले आहेत. त्यापैकी ३०३ प्रस्ताव बँकांनी मंजूर केलेले असून ४८७ कर्ज प्रस्ताव बँकांकडे निर्णय प्रक्रियेत आहेत.
(२) सदर प्रकरणी नवीन उद्योजकांना कर्ज उपलब्ध करून देण्याबाबत जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली वेळोवेळी बँकांच्या बैठका घेण्यात येतात. जिल्हा कार्यबल समितीच्या सभेत बँकनिहाय कर्ज प्रस्तावांचा आढावा घेण्यात येतो. त्यानुसार कर्जप्रस्ताव नामंजूर करताना बँकेने दिलेल्या कारणांचे निराकरण करून कर्जप्रस्ताव फेरसादर करणे शक्य आहे. अशा सर्व लाभार्थी व बँक अधिकाऱ्यांसोबत बैठक आयोजित करून प्रकरण मंजूरीकरिता आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच बँकांकडे प्रलंबित असलेली ४८७ प्रकरणे चालू आर्थिक वर्षामध्ये मंजूर करून घेण्याची कार्यवाही सुरू आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयातील अर्धवेळ शिक्षकांचे वेतन शालार्थ प्रणालीतून अदा करण्याबाबत

**(३२) * २०२२१ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने दिनांक १ मार्च, २०२३ रोजी दोन शाळा/शाखा/तुकड्यांवर अर्धवेळ म्हणून काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे दुसऱ्या अर्धवेळ कार्यभाराचे वेतन शालार्थ प्रणालीतून करण्याबाबत शासन निर्णय काढला असून सदर शासन निर्णयात एकाच संस्थेच्या दोन वेगवेगळया शाळांमध्ये /एकाच शाळेच्या वेगवेगळया शाखांमध्ये /एकाच शाळेच्या अनुदानित तसेच अंशत: अनुदानित तुकडीवर अशा दोन ठिकाणी अर्धवेळ शिक्षक पदाचा कार्यभार पार पाडणाऱ्या कर्मचाऱ्यांचे वेतन शालार्थ प्रणालीतून अदा करताना शासनाने घोषित केलेल्या अनुदानानुसार अनुज्ञेय टक्केवारीनुसार एकाच शाळेतून काढण्यात यावे असे नमुद केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निर्णयात दोन संस्थेच्या दोन वेगवेगळया अर्धवेळ शिक्षक पदाचा कार्यभार पार पाडणाऱ्या कर्मचाऱ्यांचे वेतन शालार्थ प्रणालीतून अदा करण्याबाबतचा कुठेच उल्लेख नसल्याने अर्धवेळ

शिक्षक श्री.अविनाथ जाधव, यांचे माहे ऑगस्ट, २०१९ पासूनचे श्रीमती पार्वती शंकर बापट विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयातील प्रलंबित असलेले वेतन अदयापही शालार्थ प्रणालीतून अदा करण्यात आलेले नसल्याने अशा अर्धवेळ शिक्षकावर अन्याय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अशा प्रकारे दोन संस्थेच्या दोन वेगवेगळया ठिकाणी काम करणाऱ्या अनेक अर्धवेळ शिक्षकाचे वेतन प्रलंबित असून यासंदर्भात मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, यांनी मा.शालेय शिक्षण मंत्री, उपसचिव, शिक्षण विभाग, मुंबई, उपसंचालक, कोल्हापूर, यांना दिनांक २५ एप्रिल,२०२३ रोजी वा त्यासुमारास पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे चौकशीच्या अनुषंगाने शासन निर्णयात सुधारणा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) हे खरे आहे. एकाच संस्थेच्या दोन शाळा/शाखा /तुकड्यांवर अर्धवेळ म्हणून काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे दुसऱ्या अर्धवेळ कार्यभाराचे वेतन काढण्यात येत नसल्याची तक्रार प्राप्त झाल्याने सदर शासन निर्णय काढण्यात आलेला होता.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.
(४) याबाबत संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) यांच्याकडून अहवाल मागविण्यात आलेला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात ११ वी प्रवेशासाठी शालेय शिक्षण विभागाने नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्राची अट रद्द करण्याबाबत

**(३३) * २०७७५ श्रीमती उमा खापरे, श्री.रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे, प्रा.राम शिंदे, श्री.निलय नाईक :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ११ वीच्या प्रवेशासाठी गेल्या तीन वर्षांपासून शालेय शिक्षण विभागाने नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्राची अट घातल्याने ऐन प्रवेश काळात हे प्रमाणपत्र मिळविण्यास पालकांना अडचणी येत असल्याची बाब माहे मे, २०२३ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र नसल्यास प्रतिज्ञापत्र देऊनही पालकांना अडचणी येत असल्याने प्रवेशासाठी असलेली ही जाचक अट काढून टाका अशी मागणी पालकांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्राची अट रद्द करण्याबाबत कोणती उपाययोजना/कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) अंशत: खरे आहे.

(२) नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करण्यास मुदतवाढ देण्याबाबतची निवेदने शासनास प्राप्त झाली आहेत.

(३) सन २०२३-२४ च्या इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेसाठी (EWS) प्रवर्गातून प्रवेश घेणाऱ्या ज्या विद्यार्थ्यांनी उत्पन्नाचे दाखल मिळणेसाठी प्रस्ताव दाखल केले आहे त्या विद्यार्थ्यांकडून हमीपत्र भरुन घेऊन आणि नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र नसणाऱ्या विद्यार्थ्यांना पोहोच पावती किंवा हमीपत्र घेऊन ३ महिन्यांची मुदत देऊन कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश देण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे उपकेंद्र वाशिम येथे स्थापन करणेबाबत

**(३४) * १९७९७ श्री.किरण सरनाईक : तारांकित प्रश्न क्रमांक १३६७९ ला दिनांक १८ ऑगस्ट, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे वाशिम येथे उपकेंद्र स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेपुढे ठेवण्याची विद्यापीठामार्फत सुरु असलेली कार्यवाही अद्यापपर्यंत पूर्ण झाली नसल्याची बाब माहे मे, २०२३ च्या शेवटच्या सप्ताहात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपकेंद्र स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव विद्यापीठाकडून व्यवस्थापन परिषदेपुढे सादर न केल्यामुळे विद्यार्थींची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तद्नुसार संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे उपकेंद्र वाशिम येथे सुरु करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) खरे नाही. या संदर्भातील प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेसमोर ठेवण्याची कार्यवाही पूर्ण झाली आहे.

(२) खरे नाही.

(३) सदरहू उपकेंद्र सुरु करण्यास मान्यता देण्याची बाब विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या निजामकालीन शाळांच्या इमारतींच्या दुरुस्तीकरिता निधी देण्याबाबत

**(३५) * १८८२८ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : तारांकित प्रश्न क्रमांक ११८७२ ला दिनांक २२ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या २१९८ प्राथमिक व माध्यमिक शाळा असून माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान जिल्हा परिषदेच्या शाळांची तपासणी केली असता त्यातील १५७८ वर्ग खोल्या ह्या पत्र्याच्या शेडमध्ये असल्याचे निदर्शनास आले असून तपासणी अहवालानुसार जिल्ह्यातील ७२६ प्राथमिक वर्गाच्या खोल्या आणि माध्यमिक वर्गाच्या १०५ खोल्यांची दुरुस्ती करणे आवश्यक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पायाभुत सोयी-सुविधांसाठी शासनाने निजामकालीन शाळा दुरुस्तीसाठी रुपये ९ कोटी उपलब्ध करुन दिले, मात्र या योजनेतंर्गत पुनर्बांधणी व दुरुस्तीसाठी येणाऱ्या खर्चाच्या ८० टक्के निधी शासन, १० टक्के जिल्हा परिषद व १० टक्के लोकवर्गणीतून करण्याचे नियोजन आहे, त्यामुळे या योजनेला प्रतिसाद मिळत नाही, तरी शासनाने याबाबतचा विचार करुन शाळा दुरुस्तीसाठी लोकवर्गणी व जिल्हा परिषद उपकराची अट शिथील करणे गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्ह्यातील ८३९ शाळांच्या १ कोटी १५ लक्ष थकीत वीज देयकामुळे महावितरणने वीजपुरवठा खंडीत केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जिल्ह्यातील वर्ग खोल्यांची दुरुस्ती/नवीन बांधकाम करणे व वीज देयकाची थकीत रक्कम अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) अंशत: खरे आहे.

जिल्हा परिषदेच्या २,१३१ प्राथमिक व माध्यमिक शाळा आहेत. १,५७८ वर्गखोल्यांना पत्र्याचे छत आहे तथापि, कोणतीही वर्गखोली पत्र्याच्या शेडमध्ये नाही. प्राथमिक वर्गांच्या ७२६ व माध्यमिक वर्गांच्या १०५ वर्गखोल्यांच्या दुरूस्तीची गरज आहे.

(२) अंशत: खरे आहे.

राजमाता जिजाऊ शैक्षणिक गुणवत्ता विकास अभियान अंतर्गत रुपये ८८७.६९ लक्ष इतका निधी वितरित करण्यात आला आहे. जिल्हा परिषदाकडून १०% निधी उपलब्ध करण्यात अडचणी आल्याने २०% निधी लोकसहभागातून उभारला जात आहे. यातील ५ वर्गखोल्यांचे बांधकाम पूर्ण झाले असून ८५ वर्गखोल्यांची दूरूस्ती पूर्णत्वाकडे जात आहे.

(३) अंशत: खरे आहे.

वीज पुरवठा खंडीत केलेल्या शाळांची थकीत वीज देयके भरण्यात आली असून व शाळांमध्ये विद्युत पुरवठा सुरळीत चालू आहे.

(४) शासन व जिल्हा परिषदेकडून वर्ग खोल्यांची निकड व निधीच्या उपलब्धतेनुसार जिल्हा परिषद सेस फंड, जिल्हा नियोजन समिती, जिल्हा खनिज निधी, १५ वा वित्त आयोग, आमदार- खासदार निधी, सी.एस.आर फंड, समग्र शिक्षा अभियान व राजमाता जिजाऊ शैक्षणिक गुणवत्ता विकास अभियान इत्यादीमधुन वर्गखोली दुरूस्तीची/बांधकामांची तजवीज ठेवली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## टेंभुर्णी - बार्शी- लातूर हा राज्यमार्ग सोलापूर-पुणे राष्ट्रीय महामार्गाला जोडणाऱ्या रस्त्याचे काम पूर्ण करण्याबाबत

**(३६)** * **१९८४० श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टेंभुर्णी-बार्शी-लातूर हा राज्यमार्ग सोलापूर-पुणे राष्ट्रीय महामार्गाला जोडणाऱ्या रस्त्याच्या चौपदरीकरण करण्याच्या कामास शासनाने मंजुरी दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त महामार्ग राज्याच्या सार्वजनिक बांधकाम विभाग अथवा राष्ट्रीय महामार्ग यांच्यापैकी कोण करणार हा वाद असल्यामुळे त्याची झळ जनतेला बसत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी सदरचा महामार्ग पूर्ण करण्यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर महामार्गाचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) अंशत: खरे आहे.

टेंभूर्णी-बार्शी-लातूर या महामार्गाचे चौपदरीकरण करण्याबाबतची घोषणा मा.केंद्रीय मंत्री, रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालय यांनी लातूर येथील भुमीपूजनाच्या कार्यक्रमामध्ये माहे नोव्हेंबर, २०२१ मध्ये केलेली आहे. केंद्रशासनाने अद्यापपर्यंत चौपदरीकरण करण्याच्या कामास अद्याप मंजुरी दिलेली नाही.
(२) हे खरे नाही.
(३) टेंभुर्णी ते लातूर (रा.म.क्र.५४८सी व रा.म.क्र.६३) या महामार्गाचे सविस्तर प्रकल्प अहवालासाठी सुधारित वावाच्या किंमतीस केंद्र शासनाने माहे जुलै, २०२३ मध्ये मंजुरी दिली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्ह्यातील पेण, उरण, पनवेल तालुक्यातील सेझसाठी संपादित केलेल्या शेत जमिनी शेतकऱ्यांना परत करण्याबाबत

**(३७)** * **२०७७७ श्रीमती उमा खापरे, श्री.रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे, प्रा.राम शिंदे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील पेण, उरण, पनवेल तालुक्यांतील येथील ४५ गावांच्या सुपीक शेतजमिनी शासनाने सेझसाठी संपादित केल्या असून गत पंधरा वर्षांत येथे कोणताही प्रकल्प झाला नसल्याने या जमिनी शेतकऱ्यांना परत कराव्यात अशी मागणी शेतकऱ्यांनी केली असल्याचे माहे मे, २०२३ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर जमिनी शेतकऱ्यांना परत देण्याबाबत कोणती उपाययोजना/कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) होय.

(२) व (३) मे. मुंबई सेझ (विकासक : गुजरात पोसिस्ट्रा पोर्ट इन्फ्रास्ट्रक्चर लि.) यांना मौजे खोपटा, जिल्हा-रायगड येथे १०,००० हे. क्षेत्रावर बहुउद्देशिय विशेष आर्थिक क्षेत्र स्थापित करण्यास केंद्र शासनाने त्यांच्या दिनांक ०८/०८/२००३ च्या आदेशान्वये तत्वत: मान्यता दिलेली आहे. महामुंबई विशेष आर्थिक क्षेत्र लि., मुंबई यांना मुंबई कुळ वहिवाट व शेत जमीन अधिनियम, १९४८ (सुधारणा १९९४) मधील कलम ६३ (I) A (II) मधील तरतुदीनुसार विकास आयुक्त (उद्योग) यांच्या दिनांक ०८/०८/२००३ व दिनांक १६/०६/२००५ च्या आदेशान्वये विकासक यांना रायगड जिल्ह्यातील ११६६०.०१ हेक्टर शेत जमीन खरेदी करण्यास तत्वत: मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार रायगड जिल्ह्यातील उरण,पेण व पनवेल तालुक्यांतील ४५ गावांतील ८१३४-९७-९१ हे.आर. जमिनी खरेदी करण्याकरिता भूसंपादन अधिनियम १८९४ मधील कलम ६ च्या अधिसूचना जून, २००७ ते ऑगस्ट, २००७ या कालावधीत विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे कार्यालयामार्फत महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्या होत्या. ८१३४-९७-९१ हे.आर. जमिनीपैकी सहमतीदर्शक निवाड्याव्दारे, विकास आयुक्त (उद्योग) व जिल्हाधिकारी, रायगड यांच्या आदेशानुसार एकूण १६८३.६२४६ हे.आर जमीन खरेदी करण्यात आलेली आहे व त्या जमिनीचा ताबा महामुंबई सेझकडे देण्यात आलेला आहे. उर्वरित जमीन भूसंपादनाच्या प्रक्रियेतून वगळण्यात आली आहे. रायगड जिल्ह्यातील मुंबई बहुउद्देशीय सेझ प्रकल्प विकसित न झाल्याने, प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी, रायगड यांच्याकडे मुंबई कुळ वहिवाट व शेत जमीन अधिनियम, १९४८ (सुधारणा १९९४) च्या कलम ६३ (१) (अ) मधील तरतूदीनुसार त्यांच्या जमिनी मूळ किंमतीला परत करण्याबाबत जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडे वेळोवेळी टप्याटप्याने एकूण ५२३ दावे दाखल केले आहेत. सदर दाव्यांवर एकूण २२ सुनावण्या संपन्न झाल्या असून, अंतिमत: दिनांक १५/०२/२०२३ रोजी सुनावणी प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. सुनावणी अंती प्रकल्पग्रस्तांना जमीनी परत करण्यासंदर्भात योग्य तो निर्णय घेण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी, रायगड यांचे स्तरावर सुरु आहे.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१) (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.